(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९५९] १ एस. सी. आर ७८७

सी. के. अच्युथन

- विरुद्ध -

केरळ राज्य आणि इतर

( सर न्यायाधीश एस. आर. दास, न्यायमूर्ति एस. के. दास, न्यायमूर्ति पी. बी. गजेन्द्रगडकर, न्यायमूर्ति के. एन. वांचू आणि न्यायमूर्ति एम. हिदायतुल्लाह)

*मूलभूत हक्काचें उल्लंघन-शासनाला माल पुरविण्याचे कंत्राट – रोजगाराचे संविदा लेख किंवा कसे ? - कंत्राट रद्द करून दुसऱ्यास देणे - भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १४, १६(१), १९(१)(जी), ३१ अन्वये भेदभावकारी किंवा कसे ?*

कन्नानूर येथील शासकीय रुग्णालयात सन १९४८-४९ साठी दूध पुरवठ्यासाठी याचिकाकर्ते व उत्तरवादी क्रमांक तीन- सहकारी दूध पुरवठा संस्था, कन्नानूर यांनी निविदा सादर केल्या होत्या आणि त्यांची छाननी करणाऱ्या अधीक्षकांनी याचिकाकर्त्याची निविदा स्वीकारली व सार्वजनिक आरोग्य संचालकांना सदर निर्णयामागची कारणे कळविली. त्यानंतर निविदेच्या खंड २० च्या अनुषंगाने आवश्यक ती नोटीस दिल्यानंतर याचिकाकर्त्याचे कंत्राट रद्द करण्यात आले व त्यांना कळविण्यात आले की, कन्नानूर जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय संस्थांना पुरवठ्याच्या बाबतीत सहकारी दूध पुरवठा संघाला महसूल विभागाने ठरवून दिलेल्या किमतींच्या आधारे कंत्राटे देण्यात यावीत, असे शासनाचे धोरण आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये दाखल केलेल्या याचिकेत याचिकाकर्त्याने असा युक्तिवाद केला की, उत्तरवादी क्रमांक तीन च्या तुलनेत त्याच्याविरुद्ध भेदभाव करण्यात आला होता आणि त्याला राज्यांतर्गत रोजगाराची समान संधी नाकारण्यात आली होती आणि अनुच्छेद १४, १६(१), १९(१)(जी) आणि ३१ अंतर्गत मूलभूत अधिकारांचे उल्लंघन केले गेले.

असे मत व्यक्त करण्यात आले की, प्रस्तुत प्रकरणात कोणत्याही मूलभूत अधिकाराचा समावेश नव्हता.

सरकारकडून घेतलेला कंत्राट हा खाजगी पक्षाकडून घेतलेल्या कंत्राटीपेक्षा वेगळा नसतो आणि जेव्हा एखाद्या व्यक्तीऐवजी दुसऱ्या व्यक्तीची निवड केली जाते, तेव्हा पीडित पक्ष अनुच्छेद १४ च्या संरक्षणाचा दावा करू शकत नाही.

माल पुरविण्याचे कंत्राट हे रोजगाराचे संविदा लेख नाही आणि सरकारी रुग्णालयाला दूध पुरवठा करणारा याचिकाकर्ता कोणत्याही अर्थाने कर्मचारी नव्हता आणि कर्मचारी म्हणून रोजगाराचा प्रश्नच उद्भवत नव्हता. त्यामुळे अनुच्छेद १६ (१) या प्रकरणात लागू होत नाही.

मूळ अधिकार क्षेत्र : याचिका क्रमांक १०३/१९५८.

राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी याचिका.

याचिकाकर्त्यासाठी एम. टी. पाईकेडे आणि गणपत राय.

उत्तरवादी क्रमांक १ साठी सरदार बहादूर

उत्तरवादी क्रमांक ३ साठी एम. आर. कृष्णा पिल्लै

दिनांक : ११ दिसंबर, १९५८

**न्यायमूर्ति हिदायतुल्लाह यांनी दिलेले न्यायनिर्णय** :- सदर याचिका राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये सी. के. अच्युथन नावाच्या एका व्यक्तीने दाखल केली आहे, ज्याने १९५८-१९५९ या वर्षासाठी दूध आणि आहाराच्या इतर वस्तूंच्या पुरवठ्यासाठी कंत्राट घेतल्याचा दावा केला आहे. परंतु त्याच्याकडील दूध पुरवठ्याचे कंत्राट जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्याने (यातील उत्तरवादी क्रमांक दोन) रद्द केल्याचे सांगितले जात आहे. सदर दूध पुरवठ्याचे कंत्राट आता उत्तरवादी क्रमांक तीन- सहकारी दूध पुरवठा संस्था, कन्नानूर यांना देण्यात आले आहे.

याचिकेवरून असे दिसते की, याचिकाकर्त्याकडे १९४६ पासून कन्नानूर (केरळ राज्य) येथील शासकीय रुग्णालयाला दूध पुरवठ्याचे कंत्राट होते आणि याअगोदर त्याचा भाऊ, जो याच व्यवसायात होता, त्याने वर्ष १९३६ पासून अशीच कंत्राटे घेतली होती.

वर्ष १९५७ मध्ये "कंत्राटनिश्चितीसाठी एकसमान कार्यपद्धती"अवलंबली गेली आणि अधिसूचनेद्वारे निविदा स्वीकारण्याच्या अटी घालण्यात आल्या. याचिकाकर्ता तसेच उत्तरवादी क्रमांक तीन नी आपापल्या निविदा सादर केल्या, ज्या स्वारस्य असलेल्या पक्षांच्या उपस्थितीत रुग्णालयाच्या अधीक्षकांद्वारे उघडल्या जाणार होत्या. आम्हाला या प्रकरणावर

परिणाम करणाऱ्या अटी वगळता, ज्या अटींनुसार निविदा स्वीकारल्या जाणार होत्या, त्या सर्व अटींचा उल्लेख करण्याची गरज नाही. अटींमध्ये असे नमूद करण्यात आले होते की, "वर्तमान बाजार दर" टाकलेली कोणतीही निविदा स्वीकारली जाणार नाही आणि पुढे, दूध पुरवठ्यात मान्यताप्राप्त सहकारी दूध पुरवठा संघ आणि संस्थांची निविदा जर बाजार दरापेक्षा पाच टक्क्यांच्या मर्यादेच्या आत किंवा सर्वात कमी निविदा दर यापैकी जे कमी असेल, त्यांना प्राधान्य देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. कंत्राटीसाठी निविदा सादर करणाऱ्या सर्व व्यक्तींना ऐपत प्रमाणपत्र आणि कर निपटारा प्रमाणपत्रे सादर करावी लागतील आणि ठेव जमा करावी लागेल.

दिनांक २० जानेवारी १९५८ रोजी सादर करण्यात आलेल्या निविदांची छाननी करून याचिकाकर्त्याची दूध पुरवठ्याची निविदा स्वीकारण्यात आली व उत्तरवादी क्रमांक तीन ची निविदा फेटाळण्यात आली. असे दिसते की, अधीक्षकांनी ( उत्तरवादी क्रमांक २) सार्वजनिक आरोग्य संचालकांना याचिकाकर्त्याची निविदा स्वीकारण्याची आणि उत्तरवादी क्रमांक ३ ची निवीदा नाकरण्याची कारणे कळवली. आरोग्य सेवा संचालक आणि उत्तरवादी क्रमांक २ यांच्यात काही पत्रव्यवहार झाला, परिणामी याचिकाकर्त्याला देण्यात आलेले राज्य दूध पुरवठ्याचे कंत्राट रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. कन्नानूर जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय संस्थांना पुरवठा करणाऱ्या प्रकरणामध्ये सहकारी दूध पुरवठा संघाला महसूल विभागाने ठरवून दिलेल्या किमतीच्या आधारे कंत्राटे द्यावीत असे शासनाचे धोरण असल्याचे त्यांना सांगण्यात आले. आरोग्य सेवा संचालक आणि उत्तरवादी क्रमांक दोन यांच्यात आणखी काही पत्रव्यवहार झाल्याचे दिसून आले आणि निविदेतील अटींपैकी खंड २० अन्वये कार्यवाही व्हायला हवी होती आणि याचिकाकर्त्याला एक महिन्याची नोटीस दिल्यानंतरच कंत्राटे रद्द करण्यात यावे, असे उत्तरवादी क्रमांक दोनच्या निदर्शनास आणून देण्यात आले. या सूचनांच्या अनुषंगाने उत्तरवादी क्रमांक दोन ने निविदेच्या खंड २० नुसार नोटीस बजावली आणि नोटीस कालावधी संपल्या नंतर करार रद्द केला. .

वर नमूद केलेल्या अनेक आदेशांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यासाठी ही याचिका दाखल करण्यात आली आहे. यापूर्वी याचिकाकर्त्याने केरळ उच्च न्यायालयात राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अन्वये अर्ज केला होता परंतु त्याची याचिका (ओ. पी. क्रमांक २०१ /१९५८) न्यायमूर्ति रोमन नायर यांनी दिनांक ६ जून १९५८ रोजी फेटाळून लावली. मुख्य न्यायाधिश

कोशी आणि न्यायमूर्ति वैदिलिंगम ( दिनांक ७ जुलै १९५८ रोजी ए. एस. क्रमांक ३५४/१९५८ मधील निर्णयान्वये) लेटर्स पेटंट अपीलही फेटाळून लावले. उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, प्रस्तुत प्रकरण राज्य सरकारच्या कराराचे उल्लंघन करण्यापेक्षा जास्त नाही आणि दिवाणी दावा दाखल करणे आणि अनुच्छेद २२६ अन्वये कार्यवाही न करणे हा योग्य उपाय आहे.

असे दिसते की, वरील आदेशांविरुद्ध या न्यायालयाकडे अपीलाची विशेष अनुमती मागितली गेली नाही आणि हे प्रकरण अपीलाच्या मार्गाने नव्हे तर थेट घटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये याचिकाकर्त्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन म्हणून निर्णयासाठी आणले गेले आहे. या संदर्भात याचिकाकर्त्याचा युक्तिवाद असा आहे की, · त्याला कायद्याच्या दृष्टीने समान वागणूक मिळण्याचा अधिकार आहे आणि तिस-या प्रतिवादीच्या तुलनेत त्याच्याविरुद्ध भेदभाव झाला आहे. तो अनुच्छेद १४, १६ (१), १९ (१), ३१ (जी) अन्वये संरक्षणाचा दावा करतो.

आमच्या मते, यापैकी कोणतेही अनुच्छेद सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थितीला लागू करता येणार नाही. यात शंका नाही की, याचिकाकर्त्याने सरकारकडून कंत्राट मिळविण्यात यश मिळवल्याचा दावा केला आहे आणि उत्तरवादी क्रमांक तीन यात अयशस्वी झाला आहे. परंतु त्याने कंत्राट केला असला तरी याचिकाकर्त्याला त्या कंत्राटात कायम राहण्याचा पूर्ण अधिकार प्राप्त झाला नाही, कारण एका महिन्याची नोटीस दिल्यानंतर कंत्राट रद्द करण्याचा अधिकार खंड २० अन्वये सरकारने राखून ठेवला होता. सध्याच्या प्रकरणात त्या अधिकाराचा वापर नियमित होता की कायदेशीर, हा असा विषय नाही ज्यावर आपल्याला निर्णय देण्यास सांगितले जाते, कारण अशा वादाचा निकाल सामान्य दिवाणी न्यायालयांसमोरच योग्य प्रकारे होऊ शकतो, जिथे पुराव्यांचा अभ्यास आणि सविस्तर तपासणी केली जाऊ शकते.

प्रस्तुत प्रकरणाचा सारांश म्हणजे याचिकाकर्त्याला देण्यात आलेल्या कंत्राटाचा भंग झाला असेल तर तो चांगल्या किंवा वाईट कारणास्तव रद्द करण्यात आला आहे. कोणताही भेदभाव नाही, कारण खाजगी पक्षाप्रमाणेच आपल्या आवडीनुसार व्यक्तीची निवड करणे, ते पूर्ण करू इच्छित असलेले करार पूर्ण करणे हे सरकारसाठी पूर्णपणे खुले आहे. जेव्हा एका व्यक्तीची निवड दुस-या व्यक्तीऐवजी केली जाते, तेव्हा पीडित पक्ष अनुच्छेद १४ च्या संरक्षणाचा दावा करू शकत नाही, कारण एखाद्या विशिष्ट कंत्राटाची पूर्तता करण्यासाठी त्या

व्यक्तीची निवड सरकारवर सोडली पाहिजे. त्याचप्रमाणे, सरकारकडून घेतलेला कंत्राट हा एखाद्या खाजगी पक्षाकडून घेतलेल्या कंत्राटापेक्षा वेगळा नाही. कंत्राटाचे उल्लंघन झाल्यास पीडित व्यक्तीला नुकसानभरपाईसाठी किंवा योग्य प्रकरणांमध्ये, अगदी विनिर्दिष्ट पालनासाठी दावा दाखल करण्याचा अधिकार मिळू शकतो, परंतु अनुच्छेद १९ (१) (जी) नुसार कोणताही व्यवसाय करण्याच्या किंवा कोणताही उद्योग, व्यापार किंवा व्यवसाय करण्याच्या अधिकारापासून वंचित राहिल्याची तक्रार तो करू शकत नाही. तसेच कंत्राटातील एका अटीने दिलेल्या अधिकारांचा वापर करून कंत्राट रद्द होऊ नये, म्हणून राज्यघटनेच्या अनुच्छेद ३१ चा कसा वापर करता येईल, हे ही दाखवण्यात आलेले नाही.

आमच्यासमोर याचिकाकर्त्याचा मुख्य युक्तिवाद राज्यघटनेच्या अनुच्छेद १६ (१) अन्वये होता आणि त्याने राज्यांतर्गत रोजगाराच्या समान संधीचा दावा केला. सर्वप्रथम, वस्तूंच्या पुरवठ्याचा कंत्राट हा शब्द ज्या अर्थाने अनुच्छेदात वापरला आहे, त्या अर्थाने रोजगाराचा संविदालेख नाही. याचिकाकर्त्याला संस्थेच्या वतीने दूध आणण्यासाठी सेवक म्हणून काम करायचे नव्हते, तर किंमत देऊन माल पुरविण्याचा करार होता. दूध पुरवठ्याचे कंत्राट दिल्याचा दावा त्याने केला असून आपण राज्याचे कर्मचारी असल्याचा दावा केला नाही. राज्यघटनेच्या अनुच्छेद १६ (१) मध्ये त्याच्या अटींमध्ये आणि शब्दांच्या संयोगाने असे सूचित केले आहे की, हे राज्याद्वारे "रोजगार" पुरते मर्यादित आहे आणि कंत्राटदार म्हणून काम न करता सेवेतील रोजगाराच्या संदर्भात आहे. अर्थात, अशी काही प्रकरणे असू शकतात की ज्यात कंत्राटांमध्ये सेवेचा एक घटक समाविष्ट असू शकतो. सध्याच्या प्रकरणात मात्र तसा विचार निर्माण होत नाही आणि म्हणून ती प्रकरणे या अनुच्छेदात समाविष्ट आहेत की नाही हे तपासून पाहण्याची आवश्यकता नाही. परंतु हे स्पष्ट आहे की, अशी प्रत्येक व्यक्ती की जिच्या पुरवठ्याचा करार करण्याचे प्रस्ताव नाकारले जाते किंवा ज्याच्या अशा पुरवठ्याच्या कराराचा भंग केला जातो, त्याला रोजगाराची समान संधी नाकारली गेली असे म्हणता येणार नाही आणि या प्रकरणापुरतेच हे प्रकरण मर्यादित आहे.

प्रकरणातील तथ्यांकडे बघता असे प्रकट होते की, याचिकाकर्ता रुग्णालये आणि तत्सम संस्थांच्या वापरासाठी राज्याला दूध आणि इतर आहाराच्या वस्तू पुरवत होता किंवा दुसऱ्या शब्दात विकत होता. तो कोणत्याही अर्थाने सेवक नव्हता आणि सेवक म्हणून

रोजगाराचा प्रश्नच उद्भवत नव्हता. अशा परिस्थितीत राज्यघटनेचे अनुच्छेद १६ (१) प्रकरणात लागू होत नाही हे स्पष्ट आहे.

आमच्या मते राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये दाखल केलेली याचिका पूर्णपणे चुकीची आहे. यात कोणत्याही मूलभूत अधिकाराचा समावेश नाही. सदर प्रकरण, कंत्राटाचे भंग होत असल्यास नुकसान भरपाईचा दावा करण्यासाठी दिवाणी न्यायालयात नेणे योग्य ठरेल तदनुसार याचिका अयशस्वी ठरते आणि खर्चासह फेटाळली जाते.

याचिका फेटाळली.

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

X – X – X - X